# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट २८४ - २२** **दिनांक २७/०९/२०२२**

## बॅटरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतांना पकडून ४ गुन्हयांची उकल- पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत रोडच्या कडेला व पार्कींगमध्ये पार्क केलेल्या मोटार ट्रकच्या बॅटरी चोरी होण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हयांची उकल करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पेल्हार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदार यांचेकडुन माहिती प्राप्त करुन त्याच्या आधारे इसम १) सत्यप्रकाश रामसहाय यादव, वय ३३ वर्षे, २) निखिल राजु भोईर, वय १९ वर्षे, ३) अंकित श्यामलाल पाल, वय २४ वर्षे, ४) रहीम मोहम्मद सलीम खान, वय २० वर्षे, ५) अमर विनय चौधरी ऊर्फ आमन वय १८ वर्षे, ६) जुबेर अब्दुल रशिद मनिहार, वय २१ वर्षे सर्व रा. ता. वसई, जि. पालघर यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे विचारपुस करता त्यांनी मोटार ट्रकच्या बॅटऱ्या चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद आरोपीत यांना पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हा रजि.नं. ७२६/२०२२ भांदविसं कलम ३७९, ४११, ३४ या गुन्हयात दिनांक २३/०९/२०२२ रोजी अटक करण्यात आली.

त्यांचेकडे कसुन चौकशी करता त्यांनी पेल्हार पोलीस ठाणे हददीत इतर ठिकाणीही गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांचेकडुन एकुण ७५,५००/- रुपये किंमतीच्या १० मोटार ट्रकच्या बॅटऱ्या तसेच गुन्हा करण्याकरीता वापरलेला एकुण १,००,०००/- रु. किंमतीचा टाटा एस. मोटार टेम्पो असा एकुण १,७५,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे.**

१) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७२६/२०२२,भा.दं.वि.सं. कलम ३७९, ४११,३४ प्रमाणे (मुळ गुन्हा )
२) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७२८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे,
३) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७३१/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे,
४) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ५०२/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे,

सदरची कामगिरी श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पो.ना. प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, यांनी पार पाडलेली आहे.

---ooo---